# विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई

**घरफोडी करून उत्तर प्रदेश येथे पळून गेलेल्या दोन आरोपीतांना अटक केलेबाबत.**

दिनांक १५/०२/२०२० रोजी १०.४५ ते ११.४५ वाजताचे सुमारास विलेपार्ले पोलीस ठाणे हद्दीत घराचे दरवाजाचे लॉक तोडुन बेडरूममधील कपाटांचे लॉक तोडुन त्यातील सोन्याचे व चांदीचे दागिने, वस्तु तसेच रोख रक्कम चोरी केले म्हणून सदर चोरी करणा—या अनोळखी इसमाविरूदध श्रीमती सुहास दिलीप क्षीरसागर, वय ६३ वर्षे, धंदा—निवृत्त बॅक मॅनेजर, राठी— ए/३०१, सत्यम को हौ सो. सुभाष रोड, गरवारे प्लॉस्टिकच्या मागे, स्टेट बॅक ऑफ इंडिया समोर, विलेपार्ले पुर्व मुंबई ५७ यांनी तक्रार दिल्यावरून विलेपार्ले पोलीस ठाणेस गुन्हा रजि.क्र.४४/२०, कलम ४५४, ३८०भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गुन्हयांचा तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) राजेंद्र काणे करीत आहेत.

सदर गुन्हयांचे स्वरूप गंभीर स्वरूपाचे असल्याने व विलेपार्ले सारख्या संवेदनशिल परिसरामध्ये सदरची घटना घडल्याने त्याची वरिष्ठ पातळीवर अतिशय गंभीर दखल घेतली होती. गुन्हयांचा तपास लवकरात लवकर लागावा या दृष्टिने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस आयुक्त, वाकोला विभाग, श्री. चंद्रशेखर गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती अलका माडवे यांच्या नेतृत्वाखाली अधिकारी व अंमलदार यांची पथके निमार्ण करून गुन्हयांचा तपास करण्यात येत होता.

गुन्हयांच्या तपासादरम्यान घटनास्थळ परिसरातील तसेच रेल्वे स्टेशन वरील सी.सी. टी.व्हि फुटेज, घेण्यात आले होते. त्याचप्रमाणे खास पोलीस पथकामार्फत संपुर्ण मुंबई शहर, नवी मुंबई, ठाणे, नालासोपारा, पालघर, कल्याण, विरार इत्यादी परिसरातील पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा अभिलेख तपासुन चौकशी चालु होती. त्याचप्रमाणे मोबाईल फोन, कॉल डीटेल, डम्पडाटा घेवुन तांत्रिक मदतीने तपास सुरू होता. त्याचप्रमाणे घटनास्थळाच्या संपुर्ण परिसरात कोंबिग ऑपरेशन करून चौकशी करण्यात येत होती.

सलग २० दिवस गुन्हयांचा तपास सुरू असुन देखिल कोणताही सुगावा लागला नसताना गुन्हयांचे तपासी अधिकारी पोलीस निरिक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र काणे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. किशोर डोईजड व पथक यांना गुन्हयांत सहभाग असलेल्या आरोपी माहीती मिळाली. त्याअनुषंगाने अधिक माहीती प्राप्त करून वरिष्ठांची परवानगी घेवुन गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. किशोर डोईजड पो.ना.क्र.९६०३४४/संदिप म्हाडेश्वर, पो.ना.क्र. ९८०८८७/राजेश पडवळ, व पोशिक्र. ११३१५९/संतोष कांबळे असे पथक गांव दतौली, पो.स्टे. राणीपुर, जिल्हा — मऊ, राज्य— उत्तर प्रदेश येथे

पाठविण्यात आले होते. सदर ठीकाणी स्थानिक पोलीसांची मदत घेवुन दोन २७ वर्षीय इसमास अटक करून त्याच्याकडे गुन्हयासंदर्भात केलेल्या सखोल चौकशीमध्ये त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे सदर दोन्ही आरोपीतांकडुन एकुण ४७२.४० ग्रॅम सोने, (किंमत १४,१७,२००/— अंदाजे) ९ नग छोटे हिरे (किंमत १,००,०००/— अंदाजे) व रोख रक्कम रु.३,००,०००/— असे एकुण १८,१७,२००/— रूपयांची मलमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. ट्रन्झिस्ट रिमांडद्वारे पुढील तपासकामी विलेपार्ले पोलीस ठाणेस आणण्यात आले. अटक आरोपीतीना विहीत वेळेत रिमांडकामी मा. न्यायालयात हजर करीत आहोत तसेच त्यांची पोलीस कोठडी घेवुन गुन्हयासंदर्भात अधिक चौकशी करीत आहोत.

सदर गुन्हयांमध्ये संपुर्ण तपासावर मा. श्री. मंजुनाथ सिंगे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—८, श्री. चंद्रशेखर गायकवाड सहा. पोलीस आयुक्त, वाकोला विभाग, श्रीमती अलका मांडवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे नेतृत्व होते. तपासामध्ये तपासी अधिकारी पो.नि (गुन्हे) राजेंद्र काणे, स.पो.नि. किशोर डोईजड पो.ना.क्र.९६०३४४/संदिप म्हाडेश्वर, पो.ना.क्र. ९८०८८७/राजेश पडवळ, व पोशिक्र. ११३१५९/संतोष कांबळे यांनी सहभाग घेऊन गुन्हा उघडकीस आणला.

अटक आरोपीताने गुन्हयांच्या ठीकाणी कोणताही पुरावा न ठेवता पैशाच्या लालसेपोटी सदरचा गुन्हा केला असुन पोलीसांनी आहोरात्र मेहनत घेऊन अतिशय क्लिष्ट गुन्हयाची उकल करून दोन २७ वर्षीय आरोपीतास जेरबंद केले.